
VOL. 3 | ISSUE 5 | SEPT / OCT- 2017

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 3.012(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL



*Chief Editor*
**Dr. Kalyan Gangarde**

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Vol. 3 No. 5 Sept-Oct. 2017

(UGC Approved Journal No. 63716)

Impact Factor: 3.012 (IIJIF)

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies

*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade**
Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

***Co- editors***
Dr. Sadhana Agrawal (Gwalior)
Pandurang Barkale (Mumbai)
Dashrath Kamble (Kalyan)
Bharat Gugane (Nashik)

**MGEW SOCIETY'S**
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES**
**KALYAN (MAHARASHTRA)**
Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

# CONTENTS

From the Editor's Desk......... | 4

1. Adventure' As Trope: Indian Children's Literature in English / **Riyaz Ahmad Kumar | 5**
2. Ushering the Marginalized Into the Mainstream through Task Based Language Teaching / **Chumki Biswas | 7**
3. What Is Morphology In English Language Teaching (Elt) ?/ **Prakash S. Chauhan | 11**
4. Feminist Concepts In The West: Theories, History & Dynamics / **Geeta Sahu** | **14**
5. Asymmetrical Federalism And Accommodation In India / **M.Shafi Bhat | 18**
6. Social Realism in Manju Kapur's Novel 'Custody' / **Kadam K.R. & Dr. Gangane A.S. | 28**
7. Right to Information Act and Change in the People Mindset With Reference To Nanded District / **Dr. Balaji R. Bhosle | 30**
8. Return on Gold Investment- Best Option For Indian Investor / **Dr. V.S. Kshirsagar | 32**
9. Conservation of Literacy Sources Of History | **Dr. Sutawane Parimal Arvind | 34**
10. Dalit Woman In Patriarchal Construction: An Analysis Of Bama's Sangati | **Dr. Ajit Kumar** | 36
11. Pattern of Migration in Hisar City Slums | **Kiran Bala | 40**
12. विश्व भाषा के रूप में हिंदी का विस्तार / **प्रा.डॉ. भिमराव मा. मनकरे | 47**
13. मानसकार का वैज्ञानिक चिंतन / **डॉ.ए. सन्यासि राव | 50**
14. **भारत और उसके पड़ोसी देशों का तुलनात्मक विकास अध्ययन** / प्रो.कंचन श्रीवास्तव | **53**
15. पर्यावरण प्रशासन काळाची गरज / **डॉ.एम.एफ. राऊतराहे | 56**
16. **बालमजुरी व मानवाधिकार / प्रा. वृषाली फुके** | **60**
17. **शेतकऱ्यांची सद्यस्थिती आणि बारोमास कादंबरी / डॉ. राजाराम झोडगे** | **62**
18. **शहीद भगतसिंग यांचे वाचन / डॉ. घ. ना. पांचाळ | 65**
19. **महिला पोलिसांच्या समस्या/ डॉ. मीरा वि. फड** | **68**

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No. 63716**
**Impact Factor:** 3.012 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
Email: ajum24@gmail.com
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Naguri,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded amnawale@gmail.com
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taiwan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr Rajivkumar Dumka,** Zarkhand
**Dr.Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India
**Ram Bhise,** Assistant Professor, Saraswati College of Engineering, Kharghar, Navi Mumbai Maharashtra,India.
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

17.

# शेतकऱ्यांची सद्यस्थिती आणि बारोमास कादंबरी

**डॉ. राजाराम अं. झोडगे**
नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी,
मोबा.नं. ९४२०७८६९७२

साहित्य आणि समाज याचा अन्योन्य संबंध आहे. त्यामुळे समाजाच्या सर्व स्पंदनांची नोंद आजवर साहित्य येत आले आहे. साठच्या दशकानंतर समृध्द होत गेलेल्या ग्रामीण साहित्य प्रवाहाने ग्रामजीवन आणि शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांना मुखर करण्याचा प्रयत्न केला आहे. कविता, कथा, कादंबऱ्यातून ग्रामीण जीवन, संस्कृती, शेती, शेतकरी त्यांचे भावविश्व, व्यथा, वेदना इ.चे चित्रण आले आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत शेतकरी हा घटक अतिशय महत्वाचा असून जगाचा पोशिंदा आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा मूलाधार म्हणून शेतकरी ओळखला जातो. त्याला 'बळीराजा' सारखी विशेषणे लावून त्याचा राजा म्हणून गौरवही केला जातो. परंतु राजा म्हणवणाऱ्या या शेतकऱ्याची स्थिती आज अतिशय दयनीय बनली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वराज्यामध्ये सुखाचे दिवस येतील दोन घास आनंदाने खाता येतील ही शेतकऱ्याची भाबडी आशा पार धुळीस मिळाली. तसे पाहता येथील कृषीव्यवस्था कधीच सुदृढ नव्हती व आजही नाही. परंतु स्वातंत्र्य, आधुनिकीकरण, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरणामुळे शेतीला बरे दिवस येतील असे वाटले होते मात्र भ्रमनिरास झाला.

पूर्वीच्या शेतकऱ्याच्या अवस्थेबद्दल म.फुल्यांनी लेखन केले आहे. त्याचे दु:ख जगासमोर मांडले आहे. त्यानंतर अनेक साहित्यिकांनी शेतकऱ्याला साहित्यात स्थान दिले आहे. सदानंद देशमुखांची बारोमास ही कादंबरीही शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवूनच लिहिलेली कादंबरी. शेतकऱ्यांच्या जीवनात आधुनिकतेमुळे झालेले बदल अनेक लेखकांनी आपापल्या पध्दतीने मांडले आहेत. मात्र नव्या जागतिकीकरणाची चाहूल लागलेल्या शेतकऱ्यांच्या आयुष्याची कथा फारच कमी प्रमाणात लोकांसमोर आली. त्यामुळे बारोमास कादंबरीत शेतकऱ्यांसंबंधी केलेले चित्रण वाचल्यावर तिचे वेगळेपण लक्षात येते.[१] बारोमास ही कादंबरी शेतकऱ्यांच्या सद्यस्थितीवर, व्यथांवर, झगझगता प्रकाशझोत टाकते.

एकनाथ सुभानराव तनपुरे या सुशिक्षित शेतकऱ्याच्या माध्यमातून लेखकाने समकालीन कृषीव्यवस्था, शेतकरी, निसर्ग, शासकीय ध्येयधोरणे, कौटुंबिक जीवन, कृषीक्षेत्रातील क्रांती, अपेक्षाभंग, शोषण, सावकारी, उत्पादनखर्च, शेतमजूर, दुष्काळ, फसवणूक, विवंचना, वैफल्य आणि त्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या यावर प्रकाश टाकला आहे.

सुभानराव तनपुरे हे २६ एकर शेतीचे मालक असूनही त्यांची अवस्था एखाद्या मजुरापेक्षाही वाईट आहे. एकनाथ व मधू ही दोन्हीही मुले शिकलेली असून केवळ डोनेशन भरण्यासाठी पैसे नसल्यामुळे त्यांना नोकरी मिळत नाही व शेवटी शेतात राबावे लागते. शेतात रात्रंदिवस राबूनही त्यांचे हालच असतात. एवढी शेती असून घरात रोजचा किराणा नसतो. छटाक चहा-साखरेसाठी दुकानावर जावे लागते. त्यांच्या या दारिद्र्यामुळे एकनाथची शहरी बायको अलका त्याला सोडून जाते. दुष्काळात जनावरांना चारा घेण्याइतके पैसे नसल्यामुळे जनावरे विकावी लागतात. तर दगडू महाकाळाने बळकावलेली जमीन परत मिळत नाही म्हणून सुभानराव शेवटी आत्महत्या करतात. ही एका शेतकऱ्याची शोकांतिका बारोमास मध्ये लेखकाने मांडली आहे.

शेती आणि शेतकरी हे बारोमासचे कळीचे केंद्र आहे. शेती करणारांची सुखदु:खे, त्यांच्या अडीअडचणी यासंबंधीचे चित्रण आणि चर्चा-चिंतन हा या कादंबरीचा गाभाच आहे.[२] आज शेतकऱ्याला अनेकांशी संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष लहरी निसर्ग, समाजव्यवस्था, बाजारपेठा, सावकारशाही, सरकारी धोरणे, व्यापारी, सरकारी अधिकारी-कर्मचारी आणि मजुरांशीही या सर्व संघर्षाचे प्रभावी चित्र देशमुखांनी बारोमास मध्ये रेखाटले आहे.

शेतकरी हा असंघटीत क्षेत्रातील असतो. जागोजागी त्याची अडवणूक, पिळवणूक होते. बँकेच्या कर्जप्रकरणासाठी लागणारा शेतीचा सातबारा दाखलासुध्दा तलाठ्याला लाच दिल्याशिवाय मिळत नाही. (बळीमामाचे उदाहरण) कर्जासाठी बँकेत अनेक खेटे घालावे लागतात. त्यात अनंत अडचणी असतात. परिणामी खाजगी सावकारांचे प्रचंड व्याजदर असलेले पैसे काढणे आणि ते फेडता फेडताच मरणे शेतकऱ्यांच्या नशिबी येते. शेतकरी कर्जातच जन्मतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो. रात्रंदिवस खपणाऱ्या शेतकऱ्याच्या वैभवासंबंधी

इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस संस्थेचा अहवाल, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा अहवाल, कर्जमाफी, हजारो कोटींचे पॅकेज एवढे करुनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या कांही थांबत नाहीत. कृषीमालाला खर्चावर आधारीत हमी भाव मिळणे गरजेचे असतांना थेगडी, तकलादू पॅकेजवर शेतकऱ्यांची बोळवण केली जाते आणि मूळ समस्या मात्र दूरच राहते. आमदार, खासदार, मंत्री झालेले शेतकऱ्यांची मुलेच असतात पण त्यांनी आपल्याच मातीतल्या माणसांच्या समस्या विसराव्यात यापेक्षा दुर्दैव ते कोणते ?

पुराणातील बळीराजाला पाताळात दडपणाऱ्या वामनाची औलाद आजही तितक्याच ताकदीने समकालीन बळीराजाला पाताळात घालण्यासाठी सज्ज आहे. शेतीप्रधान देशाची शेखी मिरवणाऱ्या देशात काम करुन घामाचे योग्य दाम मागण्यासाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर दडपशाही, लाठीमार, गोळीबार केला जातो. त्यांना कोटींच्या तारखांच्या कचाट्यात अडकवले जाते. पंधरा वर्षात नोकदारांचे पगार पन्नासपट वाढतात आणि शेतमालाचे भाव मात्र सहापट वाढतात. जरा कांदा महाग झाला की, 'कांद्याने आणले डोळ्यात' पाणी किंवा साखर कडू झाली'

हणून बोंब ठोकली जाते आणि शेतकऱ्याचा कापूस कवडीमोल भावाने घेऊन त्यापासून बनवलेला कपडा पीसपट किंमतीत विकला जातो तेव्हा त्याबद्दल 'ब्र' सुध्दा काढला जात नाही असे का? शेतकऱ्यांच्या नावाने काढलेल्या सरकारी योजना सबसिडी शेतकऱ्यांपर्यंत पोंचतच नाहीत. सगळा फायदा होतो तो व्यापारी, पुढाऱ्यांचा. मग अस्मानी-सुलतानी संकटात सापडलेले शेतकरी आत्महत्या नाही तर काय करतील? हा प्रश्न ही कादंबरी उभा करते.

या संदर्भात चंद्रकांत वानखडे म्हणतात 'शोले सिनेमातील गब्बरसिंग दरोडेखोर बंदुकीच्या धाकावर शेतकऱ्यांना लुटत असे. आजही गब्बरसिंगचीच व्यवस्था आहे. फरक एवढाच की आजचा गब्बरसिंग लेखणी घेऊन शेतकऱ्यांना लुटत आहे. फक्त गब्बरसिंगचा अवतार बदलला. त्याची चिन्हे बदलली. टोळ्या जाऊन त्यांचे पक्ष आले. कोणाचीही सत्ता आली तरी चित्र बदलत नाही. राजा बदलतो. गुलाम तेच राहतात.'[७]

अशा आंधळ्या-बहिऱ्या समाजात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मुलं मोठी होतील तेव्हा श्रमाला आणि श्रमिकाला प्रतिष्ठा नाही हाच धडा ते गिरवतील काय ? या शेतीचे आणि समाजव्यवस्थेचे ऋण ते कोणत्या प्रकाराने फेडतील ? असे प्रश्न बारोमास आपल्यापुढे उभे करते. प्रश्नव्याकुळ आणि अंतर्मुख करते.[८] एकूण, बारोमास म्हणजे अभावग्रस्त शेतकऱ्याच्या जीवनाची शोकांत कहाणीच आहे.

शेती,शेतकरी आणि ग्रामीण जीवन हे बारोमास या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. कृषीप्रधान म्हटल्या जाणाऱ्या भारत देशात शेती आणि शेतकऱ्यांची काय परिस्थिती आहे? याचा वेध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीच्या आधारे येथे केला आहे. लहरी निसर्गावर अवलंबून असलेली शेती, ओला-कोरडा दुष्काळ, नापिकी, उत्पादन खर्च, तुटपुंजा भाव, कर्जबाजारीपणा, यामुळे हवालदिल झालेला शेतकरी सदानंद देशमुख यांनी बारोमास मधून उभा केला आहे.

**संदर्भ :**

| | |
|---|---|
| १. विनय पाटील (संपा) | बारोमास : एक अन्वयार्थ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. (मनोगत) |
| २. रत्नाकर मंचरकर | विदारक ग्रामवास्तवाचे समतोलपणे चित्रण करणारी कादंबरी : बारोमास, बारोमास एक अन्वयार्थ, संपा. विनय पाटील. पृष्ठ १२२ |
| ३. सदानंद देशमुख | बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. २००७ पृष्ठ -१०९ |
| ४. तत्रैव | पृष्ठ १५१ |
| ५. तत्रैव | पृष्ठ ७६ |
| ६. तत्रैव | मलपृष्ठ |
| ७. चंद्रकांत वानखडे | शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अंतर्नाद, मे-२०१२. पृष्ठ ४५ |
| ८. रत्नाकर मंचरकर | उनि.पृष्ठ १२३ |

❑❑❑